CR199012251813



गावठाणाचे क्षेत्रातील बिनशेती उपयोगी वापराच्या जमिनी, ज्यांचा नागरी भागात समावेश होतो त्यांचे मालकी हक्काची नोंद करण्याच्या दुहेरी पध्दत बंद करणे बाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
मंत्रालय, मुंबई-४०००३२
परिपत्रक क्रमांक आरएसम १०९०/[२१०४]/ल-६ दि. २७ डिसेंबर १९९०

परिपत्रक :

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १२२ अन्वये अधिसूचीत केलेल्या जमिनीत ज्यांचा नागरी भागात समावेश होतो व ज्या, बिगरशेती प्रयोजनासाठी वापरात येतात त्या जमिनीचा महाराष्ट्र जमीन महसूल संहिता कलम १२६ अन्वये सिटी सर्व्हे करण्यात आल्यानंतर बिगरशेतीसाठी वापरण्यात येणाऱ्या जमीनीची नोंद प्रॉपर्टी कार्डवर करण्यात येते. सदरचे प्रॉपर्टी कार्डवर नोंद झालेल्या बिनशेती जमिनीचे मालकी हक्कात काही फेरबदल झाल्यास त्याबाबतचे फेरफार महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख [तयार करणे व सुव्यवस्थीत ठेवणे ] नियम १९७१ मधील नियम २० ते ४८ मध्ये विहीत केलेल्या पध्दतीनुसार करण्यात येतात. सदरच्या फेरबदलाची माहिती सिटी सर्व्हे ऑफिसरने तलाठ्यास देणे आवश्यक आहे. जेणेकरुन तलाठी ७/१२ चे रेकॉर्ड अद्ययावत ठेवू शकेल. कारण सिटी सर्व्हे झालेल्या गावठाण क्षेत्रातील [शेतीसाठी वापरण्यात येणाऱ्या/जमिनीचे रेकॉर्ड [७/१२ उतारे इत्यादी] अद्ययावत ठेवण्याची जबाबदारी तलाठ्यावर आहे. तसेच सिटी सर्व्हे झालेल्या क्षेत्रातील व बिगरशेती वापरात असलेल्या जमिनीचा महसूल वसूल करण्याची जबाबदारी तलाठ्यावर आहे.

याबाबत शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, ज्यावेळी गावठाण क्षेत्रातील जमिनीचा सिटी सर्व्हे झालेला असतो अशा जमिनीच्या मालकी हक्कात फेरफार होतात. त्यावेळी सिटी सर्व्हे ऑफिसर किंवा तलाठी यापैकी कोणाकडे ही फेरफाराची नोंद होण्याची कार्यवाही करण्यात येते, अशा प्रकारे मालकी हक्कात सिटी सर्व्हे ऑफिसर तसेच तलाठी यांच्याकडे नोंद होण्याची दुहेरी पध्दत अंमलात असल्यामुळे हितसंबंधीत लोक व त्यांच्या सोयीप्रमाणे शेत जमिनीचे ७/१२ उतारे अथवा प्रॉपर्टी कार्डच्या नक्कला घेतात. अशी प्रकरणात व इतर

[illegible] वापरात व गैरफायदे होतात.

३. त्यासाठी सिटी सर्व्हे झालेल्या नागरी क्षेत्रातील बिनशेती वापरातील जमिनीच्या मालकी हक्काची अशा प्रकारे सुरु असलेल्या दुहेरी नोंद ठेवण्याची पध्दत बंद करण्याचा तसा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता, याबाबत शासन असे निदेश देत आहे की, नागरी भागात ज्या जमिनींना अकृषीक परवानगी देण्यात येते. त्या जमिनीची नोंद प्रॉपर्टी कार्डावर करण्यात येते. प्रॉपर्टी कार्ड ठेवण्याची व अद्ययावत करण्याची जबाबदारी सिटी सर्व्हे ऑफिसरवर असते. तेव्हा नागरी भागातील ज्या जमिनींना अकृषिक परवानगी देण्यात येते त्या जमिनींच्या बाबत सिटी सर्व्हे ऑफिसकडून प्रॉपर्टी कार्ड ठेवून त्याच्या प्रती सिटी सर्व्हे ऑफिसकडूनच देण्यात याव्यात. अशा जमिनीचे तलाठ्याकडून ७/१२ चे उतारे देण्यात येऊ नयेत व सिटी सर्व्हे ऑफिसरकडून मालकी हक्काबाबत फेरबदल झाल्याबाबतची अधिकृत माहिती प्राप्त झाल्या खेरीज कोणताही फेरबदल ७/१२ च्या उताऱ्यामध्ये करण्यात येवू नये . ह्या सूचना सर्व तहसिलदार , तलाठी व सिटी सर्व्हे ऑफिसरना देण्यात याव्यात व त्याची यापुढे अंमलबजावणी करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सही/- xxx
[म.मु. शिंदे]
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति,

जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, [म. राज्य] पुणे.